पुढारी

# महाविद्यालये विवेकी विचारांची संस्कार केंद्रे

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती गुणगौरव समारंभ


**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विवेकी विचारांची महाविद्यालये उत्तम प्रकारची संस्कार केंद्रे आहेत. प्राचार्यांनी व्यापक दृष्टीने हे संस्कार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविल्यास महाविद्यालय, संस्थेप्रती आदरभाव निर्माण होईल, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ.देवानंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती गुणगौरव समारंभ आज विद्यापीठाच्या मानव्यविद्या सभागृहात झाला. त्यानिमित्त प्राचार्यांच्या सत्कार प्रसंगी अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. शिंदे बोलत होते. यावेळी कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, विधी, शिक्षणशास्त्र या पाच विद्याशाखांमधील शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील सर्वाधिक गुणवत्ता शिष्यवृत्ती मिळविणाऱ्या शहरी, निमशहरी व ग्रामीण गटातून प्रथम आलेल्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, आजच्या युगामध्ये इंटरनेट हे महत्वाचे विकासाचे साधन म्हणून पुढे येत आहे. त्याचा शिक्षणासाठी योग्य वापर करणे गरजेचे आहे. कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी डॉ. डी.आर. मोरे, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी.पाटील आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : विद्यापीठातील गुणवत्ता शिष्यवृत्ती गुणगौरव समारंभात प्रथम आलेल्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत मान्यवर. (छाया : तय्यब अली)**




**शहरी, निमशहरी व ग्रामीण गटातून प्रथम आलेली महाविद्यालये**

कला विद्याशाखा- विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर, (शहरी), घाळी कॉलेज, गडहिंग्लज (निमशहरी), पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील महाविद्यालय, तासगाव, जि.सांगली (ग्रामीण). वाणिज्य विद्याशाखा- विवेकानंद महाविद्यालय (शहरी), घाळी कॉलेज, गडहिंग्लज (निमशहरी), वसंतदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च, वानलेसवाडी, जि.सांगली (ग्रामीण). विज्ञान विद्याशाखा- विवेकानंद महाविद्यालय (शहरी), यशवंतराव चव्हाण सायन्स महाविद्यालय, कराड (निमशहरी), आर.बी.माडखोलकर महाविद्यालय, चंदगड (ग्रामीण).

**अभियांत्रिकी विद्याशाखा**- तंत्रज्ञान अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ (शहरी), डॉ.जे.जे.मगदूम कॉलेज ऑफ इंजि. जयसिंगपूर, टेक्सटाईल अँड इंजि. इन्स्टियूट इचलकरंजी (निमशहरी), कोल्हापूर इन्स्टिट्यूट ऑल टेक्नॉ.कॉलेज ऑफ इंजि. (ग्रामीण). विधी विद्याशाखा- शहाजी लॉ कॉलेज (शहरी), भारती विद्यापीठाचे यशवंतराव चव्हाण लॉ कॉलेज, कराड (निमशहरी). शिक्षणशास्त्र विद्याशाखा- शिक्षणशास्त्र अधिविभाग, विद्यापीठ (शहरी), कर्मवीर हिरे आर्टस्, कॉमर्स, सायन्स अँड एज्यु.गारगोटी. (निमशहरी).

लोकमत

## देवानंद शिंदे : शिवाजी विद्यापीठ शिष्यवृत्ती गुणगौरव कार्यक्रम

# शिक्षणातून क्षमता वृद्धिंगत करा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : स्पर्धेला सामोरे जाण्यासाठी शिक्षण हे उत्तम प्रकारचे साधन आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून आपल्या क्षमता वृद्धिंगत कराव्यात. त्याचबरोबर संशोधन, व्यवस्थापन आणि कौशल्ये आत्मसात करावीत, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी मंगळवारी येथे केले.

विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती गुणगौरव कार्यक्रमात ते बोलत होते. विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृहातील या कार्यक्रमास कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील प्रमुख उपस्थित होते. कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, शिष्यवृत्ती गौरव कार्यक्रम म्हणजे महाविद्यालयांच्या यशाचे, प्रगतीचे आणि त्यांच्या क्षमतेचे प्रतीक आहे. विवेकी विचारांची महाविद्यालये उत्तम प्रकारची संस्कारकेंद्रे आहेत.

प्राचार्यांनी व्यापक दृष्टीने हे संस्कार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविल्यास महाविद्यालय, संस्थेप्रती विद्यार्थ्यांत आदरभाव निर्माण होईल. या कार्यक्रमात सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील सर्वाधिक गुणवत्ता शिष्यवृत्ती मिळविणाऱ्या शहरी, निमशहरी व ग्रामीण या गटांतून सर्वप्रथम आलेल्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.



शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये विवेकानंद महाविद्यालय अव्वल ठरले आहे. या महाविद्यालयाचे प्राचार्य एस. वाय. होनगेकर यांना कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते प्रशस्तिपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी शेजारी डी. आर. मोरे, विलास नांदवडेकर, व्ही. टी. पाटील, आदी उपस्थित होते.

### विवेकानंद महाविद्यालय, घाळी कॉलेज अव्वल

सन २०१७-१८ मध्ये गुणवत्ता शिष्यवृत्ती मिळविणाऱ्या निमशहरी आणि ग्रामीण महाविद्यालयांच्या गटात विवेकानंद महाविद्यालय व गडहिंग्लजचे घाळी कॉलेज अव्वल ठरले. शिष्यवृत्ती मिळालेली विद्याशाखा, गटनिहाय महाविद्यालये : कला शाखा (अनुक्रमे शहरी, निमशहरी, ग्रामीण गट) : विवेकानंद महाविद्यालय, घाळी कॉलेज, पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय तासगाव (सांगली). वाणिज्य : विवेकानंद महाविद्यालय, घाळी कॉलेज, वसंतरावदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च वानलेसवाडी (सांगली).

विज्ञान : विवेकानंद महाविद्यालय, यशवंतराव चव्हाण सायन्स महाविद्यालय, कऱ्हाड; आर. बी. माडखोलकर महाविद्यालय, चंदगड. अभियांत्रिकी : शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभाग, डॉ. जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, जयसिंगपूर आणि टेक्स्टाईल अँड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूट, इचलकरंजी; केआयटी कॉलेज.

विधी : शहाजी लॉ कॉलेज, यशवंतराव चव्हाण लॉ कॉलेज (कऱ्हाड). शिक्षणशास्त्र : शिवाजी विद्यापीठ शिक्षणशास्त्र विभाग, कर्मवीर हिरे आर्टस, कॉमर्स, सायन्स अँड एज्युकेशन, गारगोटी.

# विवेकानंद महाविद्यालय अव्वल



गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रदान कार्यक्रमात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते प्रमाणपत्र स्वीकारताना विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. वाय होनगेकर. यावेळी डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त लेखाअधिकारी व्ही. टी. पाटील.

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'विवेकी विचारांची महाविद्यालये उत्तम प्रकारची संस्कारकेंद्रे आहेत. प्राचार्यांनी व्यापक दृष्टीने हे संस्कार विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविल्यास महाविद्यालय, संस्थेप्रती विद्यार्थ्यांत आदरभाव निर्माण होईल', असे प्रतिपादन कुलगुरू डॉ.देवानंद शिंदे यांनी केले. शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती गुणगौरव समारंभ विद्यापीठाच्या मानव्यविद्या सभागृहात झाला. त्यानिमित्त प्राचार्यांच्या सत्कारप्रसंगी अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. शिंदे बोलत होते.

## तंत्रज्ञान विभागात मगदूम व केआयटी कॉलेज प्रथम

विवेकानंद कॉलेजने कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील शहरी विभागात प्रथम क्रमांक पटकावला. कला व वाणिज्य शाखांमध्ये निमशहरी विभागात गडहिंग्लज येथील घाळी कॉलेजने द्वितीय तर तासगाव येथील डॉ. वसंतदादा पाटील महाविद्यालयाने तृतीय क्रमांक पटकावला. विज्ञान शाखेत कराड येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाने द्वितीय तर चंदगड येथील आर. बी. माडखोलकर कॉलेजने तृतीय क्रमांक पटकावला.

अभियांत्रिकी विभागात शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभाग, मगदूम कॉलेज व केआयटी कॉलेज अव्वल ठरले. तर विधी विभागात शहाजी लॉ कॉलेज व भारती विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण लॉ कॉलेजने यश मिळवले. शिक्षणशास्त्र विभागात शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागाने प्रथम तर कर्मवीर हिरे कॉलेजने द्वितीय क्रमांक पटकावला.

कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, विधी, शिक्षणशास्त्र या पाच विद्याशाखांमधील सन २०१७ १८ या शैक्षणिक वर्षातील सर्वाधिक गुणवत्ता शिष्यवृत्ती मिळविणाऱ्या शहरी, निमशहरी व ग्रामीण या गटातून सर्व प्रथम आलेल्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार डॉ. डी.आर. मोरे, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी.पाटील यांची उपस्थिती होती.

यावेळी पारितोषिक विजेत्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी मनोगत व्यक्त केले. कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर यांनी प्रास्ताविक केले.

लोकमत

# महिन्याला एक पोस्टकार्ड मिळायचे

**नमन कुलगुरुंच्या गुरुजनांना...** आपला विद्यार्थी शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्चपदी विराजमान झाल्यानंतर शिक्षकाला होणारा आनंद शब्दांत मावणारा कसा असेल? दररोज वर्गात न चुकता 'एक साथ नमस्ते' म्हणत हसतमुखाने स्वागत करणारा आणि 'अबकड' गिरविणारा आपला विद्यार्थी कुलगुरु झाल्याचे पाहून अशीच काहीशी अवस्था त्यांच्या शिक्षकांची झाली असणार. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा ५ सप्टेंबर रोजी जन्म दिन. 'शिक्षक दिन' म्हणून तो साजरा केला जातो. यानिमित्ताने कुलगुरुंनी त्यांच्या गुरुजनांना केलेले नमन त्यांच्याच शब्दांत...

**डॉ. देवानंद शिंदे**
कुलगुरु,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर



शालेय जीवनामध्ये अनेक धम्माल करणारे किस्से घडलेले आहेत. वडील पोलीस विभागात नोकरीला असल्यामुळे प्रत्येक वर्षी शाळा आणि गाव बदललेले असायचे. दहावीपर्यंतचे शिक्षण औसा, निलंगा, परांडा, लातूर, उपळा, उदगीर या ठिकाणी झाले. पोलीस चाळीत राहत असल्यामुळे मुलगा बिघडू नये म्हणून शिक्षक प्रत्येक महिन्याला वडिलांना एक पोस्टकार्ड पाठवायचे. त्याची अभ्यासात प्रगती चांगली आहे. त्याच्या शिक्षणाची बंडाळ होऊ देऊ नका, असा निरोप असायचा. असे निस्सीम प्रेम शिक्षकांकडून मिळाले. यातूनच माझी जडणघडण झाली.

प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषदेच्या शाळेतच झाले. वडिलांच्या बदल्यांमुळे शाळा नियमितपणे बदलली जायची. प्राथमिक शिक्षणात गणिताचे शिक्षक आर. एन. खडप गुरुजी अतिशय कडक होते. चेहऱ्यावरुनच गणित समजले की नाही ते ओळखायचे. घोटून घोटून शिकवायचे. याचा परिणाम मीसुद्धा माणसे ओळखायला शिकलो. इंग्रजीचे एस. ए. जाधवर प्रचंड करारी चेहऱ्याचे होते. इंग्रजी अस्खलित बोलायचे. शेक्सपिअर त्यांच्या तोंडून झरतोय की काय, असे वाटायचे. आयुष्यात जे काम करावे, ते उत्तमच असावे, हे त्यांच्याकडूनच शिकलो. मराठीच्या शास्त्री मॅडम आणि गायकवाड सरांचा माझ्यावर मोठा प्रभाव होता. गायकवाड सरांचे व्यक्तिमत्त्व भारी होते. सदैव शुभ्र धोतर, पांढरा शर्ट, टोपी या पोशाखातच असायचे. ऱ्हस्व, दीर्घ, वेलांटी, उकार, अनुस्वार कधी, कुठे आणि कसे द्यावेत हे त्यांनीच शिकवले. विज्ञानाचे जोशी सर वेगळे व्यक्तिमत्त्व. अत्यंत विनोदी स्वभावाचे. शिकवताना विविध चुटके, समर्पक गोष्ट याची जोड देऊन शिकवत. अशा ज्ञानसमृद्ध शिक्षकांच्या शिकवणीमुळेच आम्ही घडलो.

**शब्दांकन : राम शिनगारे**

सकाळ

# ‘दि मॅजिक ऑफ व्हर्बस’चे प्रकाशन



कोल्हापूर : ‘दि मॅजिक ऑफ व्हर्बस’ पुस्तक प्रकाशनप्रसंगी मान्यवर.

**कोल्हापूर, ता. ४ :** ‘दि मॅजिक ऑफ व्हर्बस’ या इंग्रजी क्रियापदांवर आधारित पुस्तकाचा प्रकाशन सोहळा केशवराव भोसले नाट्यगृहात शिवाजी विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, माजी इंग्रजी विभागप्रमुख प्रा. डॉ. जयप्रकाश शिंदे, प्रा. डी. एन. पंगू, कविता सावंत व बीझी प्रकाशनचे प्रकाशक व लेखक प्रा. एम. बी. सावंत यांच्या उपस्थितीत पार पडला.

प्रा. डॉ. जयप्रकाश शिंदे यांनी पुस्तकाबद्दल मनोगत व्यक्त केले.

ते म्हणाले, की हे पुस्तक प्रत्येकाने वाचावे. त्यामुळे इंग्रजी वाक्यरचना तयार करण्यासाठी निश्चित फायदा होईल. शिवाय, या पुस्तकात क्रियापदांची वेगवेगळी रूपे साध्या आणि सोप्या पद्धतीने मांडली आहेत. या पुस्तकाचे लेखक प्रा. एम. बी. सावंत यांनी क्रियापदांशी निगडित असलेले वेगवेगळे घटक सर्व थरातील इंग्रजी वाचकाला समजेल अशा पद्धतीने यात मांडले आहेत, असे प्रा. डी. एन. पंगू आपल्या मनोगतात म्हणाले. हे पुस्तक म्हणजे verbs, verbs every where’ असेच वाटत असून प्रा. एम. बी. सावंत यांनी क्रियापदांवर संशोधन करून हा एक प्रबंधच लिहिला आहे. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांनी इंग्रजी ही जागतिक भाषा बनली आहे. त्यामुळे आजच्या युगात इंग्रजीचे ज्ञान असणे अत्यंत गरजेचे बनलेले असल्याचे सांगितले. यावेळी शर्वरी पाटील, शीतल कासार, सुस्मित जाधव तसेच अनेक शाळा व महाविद्यालयांचे शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

Kolhapur, Kolhapur-Today
05/09/2018 Page No. 2

जनसंपर्क कक्ष
5 SEP 2018 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तंत्रज्ञानातही बुद्धीच्या कक्षा वाढवा

## दत्ताबाळ स्मृती व्याख्यानमालेत डॉ. सुभाष देसाई यांचे आवाहन

प्रतिनिधी

कोल्हापूर

आजच्या तरुणांपुढे रोबोटिक आव्हाने उभी ठाकली आहेत. त्यामुळे तरूणांनी स्वत:ला केवळ तंत्रज्ञानापुरते सिमीत न करता आपल्या बुद्धीच्या कक्षा वाढविणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन डॉ. सुभाष देसाई यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभागात आयोजित दत्ताबाळ स्मृती व्याख्यानमाले अंतर्गत 'दत्ताबाळांचे जीवन व कार्य' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. प्रकाश पवार होते.

डॉ. देसाई म्हणाले, जीवनात यशस्वी होण्यासाठी विचारांची पायाभरणी चांगली असली पाहिजे. तरुण पिढीने धर्म आणि विज्ञान यांबाबत तौलनिक चर्चा केली पाहिजे. त्याचा त्यांना निश्चित लाभ होईल. बॅ. बाळासाहेब खर्डेकर आणि प्राचार्य एम.आर. देसाई यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात जवळ-जवळ पाचशे प्राथमिक शाळा काढल्या. प्राचार्य एम.आर. देसाई यांचे दत्ताबाळ हे द्वितीय चिरंजीव होते. शाहु, फुले, आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव प्राचार्य देसाई यांच्यावर होता. सामाजिक चळवळींचा वसा त्यांनी त्यांच्यापासून घेतला. त्यानुसार वेगवेगळ्या सामाजिक उपक्रमांत ते सहभागी होत. निसर्गात, माणसांत ईश्वर पाहण्यास शिका, ही दत्ताबाळांची शिकवण होती.

अध्यक्षस्थानावरून डॉ. प्रकाश पवार यांनी दत्ताबाळ यांच्याबद्दल विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा, असे आवाहन केले. डॉ. रविंद्र भणगे यांनी प्रास्ताविक केले. सचिन चव्हाण यांनी आभार मानले.